Literacy for a Billion

Movie: Bhajivali sakhu Havaldaar bhiku
Year: 2000

Song: Nakat nathani kanat bugdi
Lyricist:

भाजीवाली सखू
नाकात नथनी कानात बुगडी
नाकात नथनी कानात बुगडी
गालावर गुलाबी लाली
माझ्या गालावर गुलाबी लाली
अहो ठुमकत मुरडत
साद हो घालीत
आली ही भाजीवाली
ठुमकत मुरडत साद हो घालीत
आली ही भाजीवाली

घ्या हो वाडीची वांगी ताजी
जरा खाऊन बघा की दाजी
घ्या हो वाडीची वांगी ताजी
जरा खाऊन बघा की दाजी
धरा अलगद मधनं चिरा
कुट दाण्याचा आत मंदी भरा
धरा अलगद मधनं चिरा
कुट दाण्याचा आत मंदी भरा
दोडका न् गवारी शेंग ही जवारी
दोडका न् गवारी शेंग ही जवारी
करा की पुढं हो थैली
तुमची करा की पुढं हो थैली
अहो ठुमकत मुरडत
साद हो घालीत
आली ही भाजीवाली
ठुमकत मुरडत साद हो घालीत
आली ही भाजीवाली

धंदा नेकीनं करते चोख
न्हाय मापात करायची पाप
धंदा नेकीनं करते चोख
न्हाय मापात करायची पाप
जरी फिरते मी दारोदारी
न्हाय चालायची हितं शिरजोरी
जरी फिरते मी दारोदारी
न्हाय चालायची हितं शिरजोरी
चाल माझी झोकात
रूप माझं लाखात
चाल माझी झोकात
रूप माझं लाखात
छत्तीस नखरेवाली
मी हो छत्तीस नखरेवाली
ठुमकत मुरडत साद हो घालीत
आली ही भाजीवाली
ठुमकत मुरडत साद हो घालीत
आली ही भाजीवाली

अहो या ना
ज्वानीचा लुटा की मळा
अहो घ्या ना
मेथी चाकवत मुळा
ठेवा की ध्यानी
शाकाहारी लई गुणी
कपाळी चंदन टिळा
अहो या ना
ज्वानीचा लुटा की मळा
अहो घ्या ना

Literacy for a Billion

मेथी चाकवत मुळा
चवीनं खावा आणि
याद माझी ठेवा
बरं का
चवीनं खावा आणि
याद माझी ठेवा
उद्याची करते बोली
आता उद्याची करते बोली
ठुमकत मुरडत साद हो घालीत
आली ही भाजीवाली
ठुमकत मुरडत साद हो घालीत
आली ही भाजीवाली
भाजीवाली सखू
अहो भाजीवाली सखू

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*